# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

फुटाळा तलाव मार्ग, नागपूर – 440 001 (म.रा.)

**Website : www.mafsu.ac.in**

## प्रवेशपुर्व अधिसुचना

### बी. एफ. एस्सी./बी. टेक (दुग्ध तंत्रज्ञान) पदवी अभ्यासक्रम प्रवेश 2020–21

विद्यापीठ अंतर्गत मत्स्य विज्ञान पदवी (बी. एफ. एस्सी.) व दुग्ध तंत्रज्ञान पदवी [बी.टेक (दुग्ध तंत्रज्ञान)] या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी 2020–21 या शैक्षणीक वर्षात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना कळविण्यात येते की, सदर प्रवेशासाठी उमेदवाराने आयुक्त तथा सक्षम प्राधिकरण, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत घेण्यांत येणाऱ्या **MHT-CET 2020** या सामाईक प्रवेश परीक्षेस बसणे आवश्यक आहे.

बी. एफ. एस्सी. व बी. टेक (दुग्ध तंत्रज्ञान) पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश (जम्मू आणि काश्मीर येथील उमेदवारांसाठी राखीव असलेल्या जागांसहीत) उमेदवाराच्या **MHT-CET 2020** हया परीक्षेतील गुणवत्तेनुसार करण्यात येतील याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. अनिवासी भारतीय /विदेशी निवासी /भारतीय वंशाचे नागरीक असणारे उमेदवार 12 वी किंवा समकक्ष परीक्षा भारतातून उत्तीर्ण झाले असल्यास त्यांना **MHT-CET 2020** ही परीक्षा देणे अनिवार्य आहे, तथापि असे उमेदवार 12 वी किंवा समकक्ष परीक्षा परदेशातून उत्तीर्ण झालेले असल्यास त्यांना **MHT-CET 2020** ही परीक्षा देणे बंधनकारक राहणार नाही.

प्रवेश परीक्षेच्या विस्तृत माहितीसाठी उमेदवारांनी **<u>www.mahacet.org</u>** हया संकेतस्थळाला भेट दयावी. बी. एफ. एस्सी. व बी. टेक (दुग्ध तंत्रज्ञान) पदवी प्रवेश प्रक्रियेबाबतची विस्तृत अधिसुचना विद्यापीठातर्फे यथावकाश प्रसिध्द करण्यात येईल. इच्छुक विद्यार्थ्यांनी अद्यावत माहितीसाठी विद्यापीठाच्या **www.mafsu.ac.in** संकेतस्थळास भेट दयावी.

दिनांक : 10/01/2020

(चंद्रभान पराते)
कुलसचिव
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ
नागपूर